## मानक २५

**१.६.४ प्रत्येक मुलांसाठी समग्र प्रगती पत्र तयार केले आहे. सर्व विद्यार्थी त्यांची प्रगती करून सातत्यपूर्ण विकासाकडे निरंतर वाटचाल करतात**

## निवडलेला स्तर : १

**१.१ संबंधित विषय शिक्षकांकडून मूल्यांकन केले जाते.**

इंदिरा कनिष्ठ महाविद्यालयामध्ये संबंधित विषय शिक्षकांकडून प्रत्येक विद्यार्थ्यांचे वेळोवेळी मूल्यांकन केले जाते. जसे मराठी, इंग्लिश व अन्य विषयाच्या बाबतीतही त्यांचे ज्ञान तपासले जाते. या विषयांमध्ये विद्यार्थ्यांचे भाषण, लेखन, वाचन कौशल्य यांचा विकास झालेला आहे की नाही हे तपासले जाते. तसेच निबंध, प्रश्न कौशल्य, दैनिक लेखन याद्वारे विद्यार्थ्यांचे वेळोवेळी मूल्यांकन केले जाते.



**शिक्षकांकडून मूल्यांकन**

त्यांच्या शैक्षणिक जीवनातील संघर्ष, विज्ञान आणि तंत्रज्ञानातील योगदान आणि खास करून अग्निक्षेपणास्त्र प्रकल्पाची यशस्विता या सर्व गोष्टींनी यांच्या जीवनाचा प्रभावी भाग दाखवला आहे.

या पुस्तकाच्या प्रत्येक पानावर डॉ. कलाम यांचे तत्वज्ञान आणि विचारधारा प्रगट दिसते. त्यांनी जीवनात साधेपणाचे महत्व आत्मानुशासन आणि कठोर परिश्रम याचा कायम आग्रह धरला. डॉ. कलाम यांचे जीवन म्हणजे एका सामान्य माणसाच्या असामान्य यशाची कथा आहे. त्यांच्या मतानुसार, आपण कुठून आलो हे महत्वाचे नाही, तर आपल्यात किती ताकद आहे आणि ती कशा प्रकारे वापतो हे महत्वाचे आहे. डॉ. कलाम यांच्या दृष्टीकोनातून व दृष्टीकोनानुसार शिक्षण नेहमीच मोठे स्वप्न पाहण्यास आणि ते साध्य करण्यासाठी अपार मेहनत घेण्यास प्रवृत्त करते. ते म्हणायचे, "स्वप्न तेच जे तुम्हांला झोप लागु देत नाहीत." या पुस्तकातून डॉ. कलाम यांनी दिलेले संदेश वाचकांच्या मनात ठसतात.

अग्निपंख हे पुस्तक वाचतांना वाचकांना विज्ञानाच्या क्षेत्रातील महत्वपुर्ण कामगिरीची माहिती मिळते. त्यांच्या कार्याने भारताला जागतिक स्तरावर मान्यता मिळवून दिली. परंतु त्यांच्या या यशापेक्षा त्यांच्या व्यक्तीमत्वातील साधेपणा, नम्रता आणि उच्च आदर्श वाचकांना अधिक प्रभावित करतात. डॉ. कलाम यांनी आपल्या जीवनातील अनेक घटना सांगुन हे सिद्ध केले आहे की, साधी सुरुवात असली तरी मेहनत, चिकाटी आणि आत्मविश्वास त्यांच्या जोरावर मोठे यश मिळवता येते.

या पुस्तकातून डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी एक नवी दिशा दाखवली आहे, जी तरुणांना त्यांच्या ध्येयाकडे वाटचाल करण्यासाठी मार्गदर्शन करते. त्यांच्या पुस्तकाचे वैशिष्ट्ये म्हणजे त्यांनी त्यांची कहाणी साध्या आणि स्पष्ट भाषेत मांडली आहे. ज्यामुळे प्रत्येक वाचकाला ती समजणे सोपे जाते.

"अग्निपंख" हे पुस्तक वाचकांना केवळ प्रेरणा देत नाही, तर त्यांना आपल्या जीवनात नवे उद्दिष्ट निश्चित करण्यास मदत करते. हे पुस्तक केवळ वैज्ञानिकांसाठी नाही, तर प्रत्येक वाचकांसाठी प्रेरणादायी आहे. कारण यातून आपल्याला आयुष्य जगण्याची नवी दिशा मिळते. या पुस्तकातून डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांनी आपल्या जीवनाचा आदर्श ठेवत तरुण पिढीला प्रगतीचा मार्ग दाखवला आहे. हे पुस्तक तरुणांनी नक्की वाचायला हवे.

धन्यवाद...!

विद्यार्थ्यांचे नाव :- कु. गौरी विनोदराव बांगडे
इयत्ता :- १२ वा   विभाग :- वाणिज्य
महाविद्यालयाचे नाव :- इंदिरा कनिष्ठ महाविद्यालय, कळंब

निबंध लेखन

# सारांश लेखन

- पुस्तकाचे नाव :→ अग्निपंख......
- लेखकाचे नाव :→ डॉ.ए.पी.जे. अब्दुल कलाम

"अग्निपंख" हे पुस्तक भारताचे माजी राष्ट्रपती आणि प्रसिद्ध शास्त्रज्ञ डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांच्या जीवनप्रवासावर आधारीत आहे. हे पुस्तक भारतीय तरुणांना त्यांच्या जीवनात उच्च ध्येय गाठण्यासाठी, प्रेरणा देण्यासाठी लिहिले गेले आहे. हे पुस्तक कलाम यांचे विचार, तत्वज्ञान आणि जीवनातील अनुभव याचे अनुकरण आहे. ज्यामुळे वाचकांना त्यांचे ध्येय साध्य करण्यासाठी नवा दृष्टीकोन मिळतो. पुस्तकांच्या सुरुवातीला डॉ. कलाम यांच्या बालपणाचे वर्णन आहे. त्यांचा जन्म रामेश्वरम येथे एका साधारण कुटुंबात झाला. त्यांच्या वडिलांनी त्यांना मेहनत प्रामाणिकपणा आणि सद्गुणीपणाचे धडे दिले. रामेश्वरमच्या शांत आणि प्रेरणादायी वातावरणात बालपण घालवल्यानंतर डॉ. कलाम यांनी आपल्या शिक्षणाच्या आणि करीयरच्या प्रवासाची सुरुवात केली. पुस्तकात त्यांच्या शिक्षणापासुन ते इस्त्रो आणि डिआरडीओ या महत्वाच्या संस्थामध्ये केलेल्या कार्यापर्यंतच्या प्रवासाचे वर्णन केले आहे.

डॉ. ए. पी. जे. अब्दुल कलाम यांना यांच्या जीवनात अनेक अडचणींचा सामना करावा लागला, परंतु त्यांच्या आत्मविश्वासाने आणि ध्येयाच्या पुर्ततेसाठी त्यांनी कधीही हार मानली नाही.

लेखन